# उदारीकरणाच्या काळातील भारतातील दूरसंचार क्षेत्राची प्रगती

**साक्षी विलास वालकुंजे**
**बी. ए. भाग 3**
**अर्थशास्त्र विभाग,**
**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर**

**गोषवारा :-**

प्रस्तुत संशोधन पेपर हा भारतातील दूरसंचार क्षेत्राच्या प्रगतीवर प्रकाश टाकतो. यामध्ये दूरसंचार क्षेत्राची वाढ व सद्यस्थिती यावर लक्ष केंद्रित केले आहे.

**प्रस्तावना : -**

1991 च्या उदारीकरणामुळे अनेक क्षेत्र आर्थिक गुंतवणुकीसाठी आणि व्यापारासाठी खुली झाली. आजचे युग हे मोबाईल क्रांतीचे युग असे आपण म्हणू शकतो. काही दिवसात 5G तंत्रज्ञान आपल्या दारी येऊन पोहोचेल. एकेकाळी प्रसिद्ध असणाऱ्या लैंडलाइन टेलिफोन चे प्रमाण लक्षणीयरित्या कमी झाले आहे. आजच्या पिढीने टेलिफोन कधी वापरले नसतील कधी एसटीडी बूथ मध्ये जाऊन फोन केला नसेल त्यासाठी लागणारी रुपयाची नाणी पाठवली नसतील. नव्वदच्या दशकात झालेली टेलिकॉम क्रांती हे आजच्या मोबाईल क्रांतीच्या युगाचे मूळ आहे. 1991 चे उदारीकरण हा या क्रांतीचा महत्त्वाचा टप्पा आहे. ऐंशीच्या दशकात या क्रांतीच्या दिशेने पावले पडायला सुरवात झाली PCO उभारणी ही 1984 नंतर सुरू झाली. यासाठी खाजगी फ्रेंचायसी देण्यास सुरू झाली. MTNL ( महानगर टेलिफोन निगम लिमिटेड ) व VSNL ( विदेश संचार निगम लिमिटेड ) ची निर्मिती झाली. 1991 मध्ये नवीन आर्थिक धोरणानुसार टेलिकॉम क्षेत्रातल्या उपकरणांचे उत्पादन पूर्णता खुले करण्यात आले. खाजगी कंपन्यांसाठी 1992 मध्ये या क्षेत्रातल्या वेगवेगळ्या सेवा मुक्त करण्यात आल्या. त्यामुळे परदेशी कंपन्या या भारताच्या बाजारपेठेत पाय ठेवू लागल्या. उदारीकरणाच्या धोरणानुसार 1994 मध्ये पहिले राष्ट्रीय दूरसंचार धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणामुळे या क्षेत्रात अमूलाग्र बदल झाले. टेलिकॉम रेग्युलेटरी अथोरिटी ऑफ इंडिया म्हणजे TARI ची स्थापना 1997 मध्ये करण्यात आली. दुसरे राष्ट्रीय दूरसंचार धोरण हे 1999मध्ये झाले. ज्याला टेलिकॉम क्षेत्रातले तिसऱ्या पिढीचे बदल असे म्हटले जाते. त्यामुळे आजचा भारत हा प्रत्येक हाती मोबाईल असलेला भारत निर्माण झाला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

- भारतातील दूरसंचार क्षेत्राची प्रगती व सद्यस्थिती अभ्यासणे.
- उदारीकरणाचा दूरसंचार क्षेत्रावर झालेला परिणाम अभ्यासणे .

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत संशोधन पेपर साठी दुय्यम तथ्य संकलन करण्यात आले आहे. त्यासाठी वेबसाईट प्रकाशित करण्यात आलेली सरकारी सर्वेक्षणे यातून दुय्यम तथ्य संकलन करण्यात आले आहे.

**तथ्य संकलन :-**

टेलिग्राफ च्या परिचयाने भारतातील दूरसंचार सुरू झाला जगातील सर्वात जुने दळणवळणाचे साधन हे भारतातील टपाल आहे.

**उदारीकरण पूर्वीचा कालखंड –**

देशातील सर्व प्रमुख शहरे आणि गावे ब्रिटिश काळात काही प्रमाणात जोडली जात होती. 1948 मध्ये टेलिफोनची एकूण संख्या फक्त 80 हजार इतकी होती. टेलिफोन ला उपयोगी साधन न मानता ती एक प्रतिष्ठेची वस्तू आहे. अशाप्रकारे तिच्याकडे पाहू लागले. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर विकासाचा दर मंदावला.

| वर्ष | दूरसंचार क्षेत्रामध्ये झालेली प्रगती |
|---|---|
| 1901 | सागर बेट आणि सॅडहेड दरम्यान पहिले वायरलेस टेलिग्राफ स्टेशन स्थापन |
| 1902 | पूर्व केबल टेलिग्राफ |
| 1907 | कानपूरमध्ये टेलिफोनची पहिली सेंट्रल बॅटरी सुरू |
| 1927 | खडकी आणि दौंड येथे इंपिरियल वायरलेस चेन बीम स्टेशन सह UK आणि भारत दरम्यान रेडिओ टेलिग्राफ प्रणाली. |
| 1947 | जबलपूर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय भारतातील पहिला इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभाग सुरू |
| 1980 | देशांतर्गत दळणवळणासाठी पहिले उपग्रह पृथ्वी केंद्र सिकंदराबाद युपी येथे स्थापन |
| 1984 | स्वदेशी विकास आणि डिजिटल एक्सचेंज च्या निर्मितीसाठी C – DOT ची स्थापना |
| 1995 | 15 ऑगस्ट रोजी पहिली मोबाईल टेलिफोन सेवा तसेच भारतात इंटरनेट ची सुरुवात |

वरील तक्त्यातुन दूरसंचार क्षेत्रामध्ये झालेली प्रगती दिसून येते. 1980-1981 ही जरी दूरसंचार क्षेत्रातील उदारीकरणाची सुरवात व 1991 चे नवीन आर्थिक धोरण हा एक महत्वाचा टप्पा असला तरी या क्षेत्रातील उदारीकरण हे पूर्णतः 1999 मध्ये झाले. जेव्हा पहिल्या राष्ट्रीय दूरसंचार धोरणाची निर्मिती झाली. त्यामुळे अटल बिहारी वाजपेयी जे तत्कालीन पंतप्रधान होते. त्यांना आधुनिक दूरसंचाराचे जनक असे म्हटले जाते.

**मोबाईल धारकांची व PCO वापरणाऱ्यांची संख्या (2001 – 2019)**

| वर्ष | मोबाईल धारकांची संख्या (दशलक्ष ) | PCO वापरण्याची संख्या (Public Call Offices ) (लाख) |
|---|---|---|
| 2001 | 3.58 | 8.60 |
| 2002 | 6.68 | 10.80 |
| 2003 | 13.19 | 14.90 |
| 2004 | 35.62 | 19.20 |
| 2005 | 56.95 | 27.70 |
| 2006 | 101.87 | 42.00 |
| 2007 | 165.09 | 55.50 |
| 2008 | 261.08 | 61.90 |
| 2009 | 391.76 | 62.00 |
| 2010 | 584.32 | 45.90 |
| 2011 | 811.60 | 33.30 |
| 2012 | 991.18 | 20.10 |
| 2013 | 867.81 | 12.60 |
| 2014 | 904.52 | 9.57 |
| 2015 | 969.54 | 7.34 |
| 2016 | 1034.11 | 5.89 |
| 2017 | 1170.59 | 4.52 |
| 2018 | 1188.99 | 3.60 |
| 2019 | 1161.71 | 2.55 |

वरील माहितीमध्ये 2000 पासून 2019 पर्यंत मोबाईल धारकांची संख्या व पीसीओ ची संख्या दर्शवली आहे. यामध्ये मोबाईल धारकांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे. 2001 मध्ये मोबाईल धारकांची संख्या 3.58 इतकी होती. ती 2005 मध्ये 56.95 इतकी वाढली. 2010 मध्ये 584.32 इतकी झाली, 2015 मध्ये 969.54 झाली, 2016 मध्ये 1034.11, 2017 मध्ये 1170.59, 2018 मध्ये 1188.99, तर 2019 मध्ये 1161.71 इतकी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

2001 मध्ये PCO वापरणाऱ्यांची संख्या 8.60 लाख इतकी होती. 2005 मध्ये 27.70 लाख इतकी वाढली. 2009 मध्ये ती 62.00 लाख इतकी झाली. पण मोबाईल मध्ये असणाऱ्या विविध सोयी मुळे 2009 नंतर PCO वापरणाऱ्यांची संख्या हळूहळू घटत गेली. 2015 मध्ये 7.37 लाख झाली व 2019 मध्ये 2.55 लाख PCO वापरकर्ते आहेत.

उदारीकरणाच्या धोरणातून भारतीय बाजारपेठ गुंतवणुकीसाठी खुली करण्यात आली असली तरी भारतात दूरसंचार क्षेत्र हे अल्प जान अधिकाराखाली येत आहे. Airtel ने Telenor India ला विकत घेतले. Vodafone आणि Idea चे विलीनीकरण होऊन जगातील दुसरी सर्वात मोठी व भारतातील सर्वात मोठी कंपनी अधिकृतपणे VI म्हणून ओळखली जाते. Airtel ने टाटा डोकोमो व टाटा टेलसर्विसेस ला विकत घेतले.

**निष्कर्ष :-**

2009 पर्यंत वाढणारी PCO ची मागणी हळूहळू घटत गेली. मोबाईल ने केलेल्या लक्षणे प्रगतीमुळे मोबाईलची संख्या वाढली. तसेच दूरसंचार क्षेत्रांमध्ये सेवा देणाऱ्या कंपन्या या अल्प अधिकाराखाली येत आहेत. सध्या भारतामध्ये Airtel , VI , Jio BSNL या सेवा देणाऱ्या कंपन्या आहेत. काही दिवसांनी या सेवा देणाऱ्या क्षेत्रात मक्तेदारी निर्माण होऊ शकते.

संदर्भ :-


- Https://timesofindia.indiatines.com
- Telecom Statistics India 2019